**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय**
"वनभवन" , रामगिरी रोड, पोलीस जिमखान्याजवळ, सिव्हील लाईन, नागपूर-440 001
दुरध्वनी क्रमांक-0712 2556937,2555673 फॅक्स क्रमांक 0712-2550675, E-mail : apccfprotection@mahaforest.gov.in

क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५ /४४३ / १८-१९
नागपूर-४४० ००१, दिनांक २१ /०१/२०१९

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर/मुंबई, व कांदळवन मुंबई
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व

**विषय:-** आगीपासुन वनाचे संरक्षण व आगीच्या घटनांचा वास्ताविक स्थिती अहवाल (Ground Verification) सादर करणे बाबत.

**संदर्भ:-**१.स्थाई आदेश पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.२०४/२०००-०१/२१०, दिनांक २२ मे,२००१
२. शासन पत्र क्रमांक संकीर्ण-०३/२०१८ प्र.क्र. ७८/ फ-६, दिनांक २७/११/२०१८
३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५/३६७/२०१८-१९, दि. ११/१२/२०१८.
४.या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५/३९९, दि. २९/१२/२०१८.
५. वरीष्ठ वनअधिकारी यांची सभा नागपूर येथे दिनांक ४ व ५ जानेवारी २०१९ मधील दिलेले निर्देश
६. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५/४१०/१८-१९, दि. ०८/०१/२०१९.
७. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५/४२४/१८-१९, दि. १५/०१/२०१९.

आगीच्या घटनावर नियंत्रण ठेवणे, त्याचा आढावा घेणे, संवेदनशिल क्षेत्रात विशेष उपाययोजना राबविणे, लागलेल्या आगीच्या घटनांचे व्यवस्थापन व मुल्यांकन करुन घेणेसाठी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व धोरण) नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक कक्ष-१५/ICT/प्र.क्र. १२०/९७५/२०१८-१९ दि. १६/०१/२०१९ अन्वये ("Near real time forest fires") आग लागलेल्या वास्तविक घटना रोजच्या रोज संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या बाबतची कार्यप्रणाली (SOP) सुध्दा पाठविण्यात आली आहे. त्या अनुषंगाने वनविभागाचे संबंधित केंद्रस्थ अधिकारी यांचे मार्फत रोजच्या रोज घटना संबंधीतास भ्रमणध्वनी द्वारे देण्याबाबत सुचित केले आहे.

भारतीय वन सर्वेक्षण देहरादुन यांचे मार्फत रोजच्या रोज लागलेल्या आगीच्या घटनाचे ई-मेल द्वारे या कार्यालयास प्राप्त होणारी माहिती, संबंधित वनवृत्तांना ई-मेल द्वारे KMZ फाईल पाठविण्यात येत आहे. गुगल अर्थ द्वारे आगीच्या ठिकाणी खंड सिमा समाविष्ठ करुन आगीच्या घटनांचे स्थळाची शहानिशा करावी, ज्यामुळे तात्काळ कार्यवाही करता येईल.

भारतीय वन सर्वेक्षण यांचे संकेतस्थळावर आगीच्या घटनांची माहिती अंक्षाश- रेखांश नुसार नियतक्षेत्रावर दररोज प्रदर्शित करण्यात येत आहे. त्यानुसार आगीच्या घटनांची तपासणी करुन वास्तविक स्थिती अहवाल (Ground Verification) सोबत दिलेल्या प्रपत्रात सादर करावा. आगीच्या घटनांचा वास्तविक स्थिती अहवाल १ जानेवारी, २०१९ पासुन पंधरवाडी अहवाल ई-मेल द्वारे सॉफ्ट कॉपी सादर करण्याची दक्षता घ्यावी.

वरील विविध माध्यमाद्वारे आगीच्या घटना नुसार आगीवर नियंत्रण ठेवावे व जळीत क्षेत्राची कमीत कमी व्याप्ती राहील याची दक्षता संबंधित वनाधिकारी/ कर्मचारी यांना घेणेबाबत निर्देश निर्गिमत करावे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे (प्रपत्राचा नमुना)
**अ.प्र.मु.व.सं.(संरक्षण) यांचे कडून मान्य मसुदा**

(एस. डब्ल्यु. नाईक)
विभागीय वनअधिकारी (संरक्षण)
प्रधान मुख्य वनसंरक्षक (व.ब.प्र) नागपूर यांचे कार्यालय

## आगीच्या घटनांमध्ये जळालेले क्षेत्र तपासणीचा दैनंदिन वा .विक स्थिती अहवाल

आगीच्या घटना दि...................... पासुन दि.........................

| फॉरेस्ट सर्वे ऑफ इंडिया कडुन दररोज प्राप्त आगीच्या घटना | | | | | | | | आगीच्या घटना तपासणीचा वास्तविक स्थिती अहवाल (Ground Verification) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | आगीच्या घटनेची तारिख | अक्षांश | रेखांश | वनविभाग | वनपरिक्षेत्र | नियतक्षेत्र | कक्ष क्र. / सर्वे क्र. | आगीची माहिती मिळाल्याचा दिनांक | आगीची माहिती मिळाल्याची वेळ | आग नियंत्रणात आल्याची तारिख | आग नियंत्रणात आल्याची वेळ | वनगुन्हा क्रमांक व दिनांक | जळालेले क्षेत्र (हे.) | अंदाजित नुकसान रु. | तपासणी तारीख/ नाव व हुद्दा (मु.व.स./ उ.व.स./ स.व.स/ व.प.अ. आणि इतर) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 1 | | | | | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | | | | | | | |



कार्यप्रणाली (SOP) सध्दा प्रतविायाग आली आहे